Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 65 – 68

DOI: 10.5281/zenodo.8337231

Original Research Article

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाचे योगदान

## (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)

प्रा. डॉ. अशोक गंगाराम अंभोरे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव ता. सेनगाव जिल्हा हिंगोली ४३१५४२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ashokambhore19@gmail.com

Received: 12 September, 2023 | Accepted: 13 September, 2023 | Published: 15 September, 2023

**महत्वाचे शब्द:** मराठवाडा मुक्ती संग्राम, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, आर्य समाजाचे, निजाम, हिंदू धर्म

### प्रस्तावना

हैद्राबाद संस्थानमध्ये निजाम सरकारच्या जातीय धर्मांध आणि सांस्कृतिक आक्रमणाचा जोरदार प्रतिकार आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक क्षेत्रात केला. आर्य समाजाची चळवळ प्रामुख्याने धार्मिक चळवळ होती. परंतु निजामी सरकारने होमहवन आणि प्रार्थना मंदिराला विरोध केला. त्यामुळे आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांस निजामाविरोधी प्रतिकाराची लाट उसळली. हिंगोली जिल्हयातील वसमत तालुक्यातील कोरटा या गावचे केशवराव कोटकर आर्य समाजचे प्रमुख प्रवर्तक हैद्राबादला होते. आर्य समाजाच्या प्रार्थना, होमहवन आणि सत्यार्थ प्रकाश या धार्मिक ग्रंथावर बंदी होती. हिंदू धर्मियावर होत असलेल्या आक्रमणाविरूध्द आवाज उठविला. हिंगोली जिल्हयातील आर्यसमाजाच्या कार्यकर्त्यांनी निजामी राजवटीच्या अन्याय व अत्याचार विरोधी प्रतिकार केला.[१]

### संशोधनाची उदिष्टये

१. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाचा अभ्यास करणे
२. आर्य समाजाच्या सामाजीक व धार्मीक कार्याचा अभ्यास करणे
३. हिंगोली जिल्हयातील आर्य समाजाचा अभ्यास करणे

**तथ्यसंकलन पध्दती:** या संशोधनासाठी प्राथमिक, दूय्यम संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे

**संशोधन पध्दती:** या संशोधनामध्ये आर्य समाजाच्या कार्याचे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**आर्य समाजाची स्थापना**

१० एप्रिल १९७५ मध्ये दयानंद सरस्वतीनी आर्य समाजाची स्थापना केली. आर्यसमाजाच्या २८ तत्वापैकी १० तत्वम, अमुता, तत्वांना वैदिक काळातील समाजव्यवस्थेत कोणत्याही अनिष्ठ प्रथा, परंपरा यांना मान्यता नव्हती. वेदामध्ये या प्रथांचा कोठेच उल्लेख नाही. वैदूकालीन समाजरचनाही जातविरहित होती. सर्वांना समान अधिकार देण्यात येत असत. आर्यसमाजाने हैद्राबाद संस्थानात हिंदू समाजाच्या धार्मिक जागृतीत आणि सामाजिक सुधारणेत अत्यंत महत्वाचे योगदान दिले आहे. आर्य समाजाच्या कार्याची सुरूवात येथूनच झाली. मराठवाडयातील हिंगोली जिल्हयातील आर्य समाजाने समाजजागृतीमध्ये महत्वाची भूमिका बजावली.[२]

**धार्मिक कार्य**

आर्य समाजाने हैद्राबाद संस्थानातील धार्मिक सुधारणेमध्ये सर्वांना वेदाध्यानाचा अधिकार सर्वांना यज्ञोपविधी, संस्कार, वैदिक, धर्माचे पुनरूज्जीवन शुध्दीकरण चळवळ या सुधारणा महत्वाच्या ठरल्या. हिंदू समाजात अनेक वाद असल्यामुळे पूजा पध्दतीत विविधता होती अनेक देवी देवता आणि रीतीभातीमध्ये हिंदू समाज विखुरला गेल्यामुळे पंथ भेदाचा भक्ष्य ठरला आहे. दलित हिंदुना आर्य समाजी बनवून त्यांना वेदविद्या शिकविण्यासाठी पाठविले. हिंदू धर्मीयामध्ये आपल्या धर्माविषयी निष्ठा जागवून त्यानिष्ठेचा उपयोग त्यांचा स्वाभिमान चेतविण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरला. हिंदू धर्माच्या खऱ्या स्वरूपात समोर ठेवून त्यांच्या मध्ये चैतन्याचा संचार उत्पन्न करण्याचे कार्य हे आर्य समाजाने केले[३].

**सामाजिक कार्य**

आर्य समाजाने हैद्राबाद संस्थानातील धारूर येथे १८८० मध्ये शाखा स्थापन केली. त्यानंतर हैद्राबाद शहरात १८९२ मध्ये शाखा स्थापन झाली. या मागचा उद्देश राज्यातील जनतेस सामाजिक व धार्मिक जागृती व्हावी, धर्माच्या नावावर हिंदू धर्मात चाललेल्या अनिष्ठ रूढी, परंपरा, प्रथा नष्ठ कराव्या हा होता. हिंदू धर्मात जातीप्रथा अस्तित्वात होती. जाती प्रथेवर आधारित भेदभावपूर्ण वागणूक समाजाला दिली जात होती. आर्य समाजाने हे कार्य सातत्याने सुरू ठेवले. या विषयी नरहर कुरूंदकर म्हणतात, आर्य समाज ही एक समाज सुधारणा करणारी संस्था आहे. सहस्त्रावधी भारतीयांना आर्य समाजाने आधुनिक शिक्षण दिले आहे. आर्य समाजाने समाज सुधारणेचे कार्य ज्या निष्ठेने पार पाडले त्याची तुलना अन्य कोणत्याही संस्थेशी करता येणार नाही. समाजसुधारणेचे कार्य हे आर्य समाजाने आपणास दिले आहे.

त्याचा स्वीकार आपण केला पाहिजे. आर्य समाजाने विधवा विवाह, दलिताचे पुन्हा शुध्दीकरण अंतर जातीय विवाह याव्दारे सामाजिक सुधारणा केली[४].

**हिंगोली जिल्हयातील आर्य समाजाचे कार्य**

हिंगोली येथे १९३० मध्ये आर्य समाजाची स्थापना झाली. धर्म पल्जी भारीत्या, सखाराम दुबेवर, नारायणदास मोदी, डॉ. पन्नालालजी आर्य, नेत्र वैद्य व भिकुलालजी भारूका यांच्या आर्य समाजाच्या विस्तार करण्यात सिंहाचा वाटा होता. आर्य समाजाच्या सत्याग्रहीने मराठवाडयातील पाचही जिल्हयामध्ये सत्याग्रह केला. या जिल्हयामधील तालुक्याच्या ठिकाणी सत्याग्रह करण्यात आले. हिंगोली जिल्हयातील वसमत तालुक्यातील कोरट या गावाचे बॅरिस्टर विनायकराव कोटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष होते.

हिंगोली येथे १९३० मध्ये शिवनारायणजी अग्रवाल यांनी आर्य समाजाची स्थापना केली. हिंगोली जिल्हयात आर्य समाजाचे केंद्र म्हणून येहळेगांव तुकाराम येथे कार्यरत होते. हिंगोली जिल्हयातील वसमत येथील लांडगे हनुमंत विश्वनाथ हे आर्य समाजाचे सत्याग्रही होते. यांनी आर्य समाजाच्या जागृतीचे कार्य केले आर्य समाजाच्या सत्याग्रहाच्या त्यांनी प्रचार केला. दिनांक २४ डिसेंबर १९३८ रोजी वसमत येथे तीन सहकाऱ्यासह त्यांनी सत्याग्रह केला. लांडगे हनुमंत विश्वनाथ, यांचे शिक्षण मराठी सातवी पर्यंत झाले. त्यांनी सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे २ वर्ष सक्त मजुरी आणि २०० रूपये दंड अशी शिक्षा झाली[५].

**हिंगोली जिल्हयातील आर्य समाजाचे सत्याग्रही**

१. सिताराम भागवत कोदाडे हिंगोली १९३८ शिक्षा ६ महिने
२. धर्मपाल यशपाल भारती हिंगोली १९३८ शिक्षा २ वर्ष
३. भद्रसेन माणिकराव राठोडहिंगोली १९३८ शिक्षा १ वर्ष
४. शामलाल भिकचंद राठोड हिंगोली १९३९ शिक्षा १८ महिने[६]

याच प्रमाणे येहळेगाव तुकाराम येथे सुध्दा आर्य समाजाचे केंद्र होते. तेथे विझानी राजवटीच्या विरोधी लोकांचे संघटन चालत असे. तेथे जरोडा येथील कोंडबाराव पाटील हे सुध्दा सहभागी होत असत. त्यांचा आर्य समाजाच्या कार्यात सक्रीय सहभाग असे. आर्य समाजाचे कार्यकर्ते त्यांची घरी येत असत. तेव्हा यांच्या पत्नी सुभद्राबाई पाटील हया जेवण बनवीत असत[७].

हिंगोली जिल्हयातील नरसी नामदेव येथील स्वातंत्र्य सैनिक बाबूसिंग चंदेल हे सुध्दा आर्य समाजाचे सक्रीय कार्यकर्ते होते[८].

**निष्कर्ष**

हैद्राबाद संस्थानामध्ये सर्व प्रथम निजाम सरकार विरूध्द आवाज उठविण्याचे आणि सत्याग्रह करण्याचे कार्य आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी केले. निजाम सरकारच्या अन्याय व अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी ही एक संस्था स्थापन करण्यात आली होती. हिंदुच्या तक्रारी दूर करणे व हिंदूचे धार्मिक व सामाजिक प्रश्न सोडविणे हा आर्य समाजाचा मुख्य हेतू होता. हैद्राबाद संस्थान मध्ये निजाम सरकारच्या विरोधात सत्याग्रहाला सुरूवात १९३८ पासून आर्य समाजाने हिंदू जनतेचे प्रबोधन करण्याने झाली. आर्य समाजाने हैद्राबाद संस्थान मध्ये हिंगोली जिल्हयात हिंदू जनतेचे धार्मिक व सामाजिक प्रबोधन करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. चारठाणकर विनायकराव, संपा, १९९६ स्वातंत्र्य संग्राम परभणी जिल्हयाचे योगदान - प्र.आ. परभणी जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती परभणी, पृष्ठ २२
२. कवठेकर बाळकृष्ण संपा, १९९८ एक उपेक्षित संघर्ष गाथा, देवगिरी प्रतिष्ठान, औरंगाबाद, पृ. ३२
३. जाधव अर्जुन १९९४ मुक्तीची प्रहार अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक संघटना, आर्गा, ता. मालकी जि. बिदर पृ. ३
४. कित्ता - पृ.क्र. ३२
५. प्रा. लोखंडे डॉ. चंद्रशेखर २०१७ मराठवाडयाचा मुक्ती लढा आणि हैद्राबाद संस्थान लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ.क्र. १८६
६. पोतदार वसंत, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, लातूर विद्याभारती प्रकाशन, पृष्ठ ६८
७. मित्रदेव कोडबाराव पाटील, स्वा.सैनिक कोंडबाराव पाटील यांचे नातू यांच्या कडून मुलाखतीव्दारे प्राप्त माहिती
८. लक्ष्मीबाई बाबूसिंग चंदेल स्वा.सैनिक बाबूसिंग चंदेल यांच्या पत्नी यांच्याकडून प्राप्त माहिती